मौजे पाटण जि. सातारा येथील १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय इमारतीच्या बांधकामासाठी कमी पडत असलेले ५.८४ गुंठे इतके क्षेत्र खरेदी करुन सदर क्षेत्राचे मुल्यांकन रु. २८,०८,९२८/- अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः- संकिर्ण २०२५/प्र.क्र.२९३/पासु-२
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २४ जून, २०२६.

<u>वाचा :</u>

१. **सहसंचालक आरोग्य सेवा) रुग्णालये ,राज्यस्तर(मुंबई यांचे पत्र क्रमांक : आसेआ/कक्ष-३ /टे.७/पाटण जागा/११६७१-७२/२५, दिनांक २४.०९.२०२५.**
२. **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रः- ग्रारुश्रे-२०१६/प्र.क्र.५१/आरोग्य-४, दि.२४ नोव्हेंबर, २०२०.**

<u>प्रस्तावना :</u>

मौजे पाटण जि. सातारा येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहेत. सदर रुग्णालय इमारतीच्या बांधकामासाठी कमी पडत असलेले ५.८४ गुंठे इतके क्षेत्र खरेदी करुन सदर क्षेत्राचे मुल्यांकन रु. २८,०८,९२८/- अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

मौजे पाटण जि. सातारा येथील १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय इमारतीच्या बांधकामासाठी कमी पडत असलेल्या ५.८४ गुंठे इतके क्षेत्र खरेदी करुन सदर क्षेत्राचे मुल्यांकन रु. २८,०८,९२८/- अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर रक्कम अदा करण्यासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक- एच-८, मुख्यलेखाशिर्ष "४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, ०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य), ११०- रुग्णालये व दवाखाने, (१) (अ)- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, इमारती (००) (०१) मोठी बांधकामे (४२१० ००१४), ५३- मोठी बांधकामे" याखाली भागविण्यात येईल.

३. मौजे पाटण जि. सातारा येथील १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धीत उपजिल्हा रुग्णालय इमारतीच्या बांधकामासाठी कमी पडत असलेल्या ५.८४ गुंठे इतके क्षेत्र खरेदी करुन सदर क्षेत्राचे मुल्यांकन अदा करण्यासाठी लागणाऱ्या रु. २८,०८,९२८/- इतक्या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्वरीत शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२४१५०६५४४५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADEEP PISE

Digitally signed by KAVITA PRADEEP PISE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=895D4DC43BA3105440C032943144 6AE8333AB89578925B2D77D3806165DBD48 7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AEEF37624AA6E5EA1AAA99D 244C6C2A5F135097E5C07486A35D423835B4 EC728, cn=KAVITA PRADEEP PISE
Date: 2026.06.24 15:23:52 +05'30'

(कविता प्र.पिसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे.
५. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
६. उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
७. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा.
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१०. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
११. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, पाटण जि. सातारा.
१२. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (पायाभुत सुविधा-२).